दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▮ अंक २३७ ▮ बुधवार १७ जून २०२६ ▮ पाने ४ ▮ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्यास ग्रुप ॲडमिनवर होणार कारवाई

## मोहरमच्या पार्श्वभूमीवर कोतवाली पोलिसांची नोटीस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरात १७ जून ते २६ जून या कालावधीत होणाऱ्या मोहरम उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये शहरातील सर्व सोशल मीडिया ऑपरेटर आणि व्हॉट्सॲप ग्रुप ॲडमिनना कायदेशीर सूचना दिली असून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर तसेच अशा पोस्ट पसरल्यास संबंधित ग्रुप ॲडमिनवरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



उत्सवाच्या काळात शहरात शांतता व सलोख्याचे वातावरण राहावे, यासाठी पोलिसांनी सोशल मीडियावरील हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. या नोटिसीद्वारे ग्रुप ॲडमिन आणि सदस्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

### पोलिसांनी केलेल्या सूचना याप्रमाणे

- व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर कोणत्याही आक्षेपार्ह किंवा वादग्रस्त पोस्ट प्रसारित करू नयेत.
- दोन गट, समाज किंवा जाती–धर्मांमध्ये तेढ निर्माण होईल असा मजकूर अथवा छायाचित्रे शेअर करण्यास सक्त मनाई आहे.
- ग्रुपवर कोणतीही अफवा पसरणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी ग्रुप ॲडमिनची असेल.

पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यास आणि सोशल मीडियावरील पोस्टमुळे कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित ॲडमिनला जबाबदार धरून प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. तसेच, ही नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात येईल, असेही पोलिसांतर्फे बजावण्यात आले आहे.

# मोदींच्या विकासदृष्टीला नवी गती; पुणे-शिर्डी रेल्वेसेवेचे सुजय विखे पाटलांकडून स्वागत

## पुणे शिर्डी थेट रेल्वे म्हणजे विकासाचा नवा ट्रॅक सुजय विखे पाटील यांची प्रतिक्रिया

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पुणे ते शिर्डी दरम्यान पहिल्यांदाच थेट रेल्वेसेवा सुरू होत असून, यामुळे साईभक्तांसह हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत या नव्या रेल्वेसेवेचे उद्घाटन आज बुधवारी (१७ जून) करण्यात आले.

भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. ते म्हणाले, शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे. पुण्याहून मिळालेल्या या पहिल्या थेट रेल्वे सुविधेमुळे लाखो भाविकांची मोठी सोय होणार असून धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी पुणेशिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकासाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या काही वर्षांत रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडून आले असून नवीन रेल्वेमार्ग, आधुनिक स्थानके, वंदे भारतसारख्या अत्याधुनिक गाड्या आणि प्रवाशांसाठी वाढलेल्या सुविधा यामुळे भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलत आहे.पुणेशिर्डीसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर थेट रेल्वेसेवा उपलब्ध करून देण्यामागे केंद्र सरकारची विकासाभिमुख भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरांना जोडण्यावर विशेष भर दिला जात आहे. पुणेअहिल्यानगरशिर्डी रेल्वेसेवा ही त्याच दृष्टीकोनाचा भाग असून यामुळे भाविक, विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिक यांना मोठा फायदा होणार आहे. रेल्वे नेटवर्कच्या विस्तारामुळे पर्यटन, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून विकसित भारताच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचेही ▮ पान ४ वर

# शोरूममध्ये महिला कर्मचाऱ्यावर हल्ला; कपडे फाडून विनयभंग

## कोतवालीत गुन्हा दाखल; आरोपी महिलेने धरली पोलीसांची गचंडी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव औद्योगिक परिसरातील चारचाकी वाहनाच्या शोरूममध्ये कार्यरत असलेल्या महिला एचआर मॅनेजरवर शोरूममध्ये घुसून शिवीगाळ, मारहाण तसेच कपडे फाडून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

३७ वर्षीय महिला केडगाव औद्योगिक क्षेत्रातील चारचाकी वाहनाच्या शोरूममध्ये मागील सहा वर्षांपासून एचआर मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. सन २०२४ मध्ये शोरूममध्ये कार्यरत असलेल्या वर्षा अभय चुतर यांना कामातील त्रुटींमुळे सेवेतून कमी करण्यात आले होते. त्यानंतर त्या वारंवार फिर्यादी महिला व शोरूम व्यवस्थापनाविरोधात शिवीगाळ करत असल्याची तक्रार यापूर्वीही देण्यात आली होती.

फिर्यादीनुसार, दि. १५ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास वर्षा चुतर या वासन टोयोटा शोरूममध्ये आल्या. त्यांनी फिर्यादी महिलेला अश्लील व अपमानास्पद शब्दांत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांनी शोरूममधील कर्मचाऱ्यांसमोर ▮ पान ४ वर



### आरोपी महिलेने टाकला खाकीवर हात

वर्षा चुतर या वाहनाच्या शोरुममध्ये येऊन शिवीगाळ करत असल्याने ११२ नंबरवर फोन करुन तक्रार करण्यात आली होती. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलीसांनी हा वाद मिटवण्याचा प्रयत्न करत असताना, आरोपी महिलेने थेट पोलीसांची गचंडी धरुन शिवीगाळ केल्याचा संतापजनक प्रकार घडला. हा प्रकार सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

झटपट श्रीमंत होण्यासाठी युट्युबवरून घेतली आयडिया!

# उबेर चालकाला लुटणारे बीडमधील तिघे जेरबंद

## एमआयडीसी पोलिसांनी कौशल्याने केला गुन्ह्याचा उलगडा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** युट्यूबवर गुन्ह्यांच्या क्लूप्त्या पाहून झटपट श्रीमंत होण्याच्या इच्छेने उबेर ॲपवरून कार बुक करून चालकाला बंदुकीचा धाक दाखवत लुटणाऱ्या तीन जणांच्या टोळीच्या मुसक्या आवळण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे.विशाल सोमनाथ तांगडे (वय १९), तुळशीराम उर्फ राम पंढरीनाथ चव्हाण (वय २१) व कल्याण उर्फ बबलू रामेश्वर गायकवाड (वय १९, तिघेही रा. आनंदवाडी, ता. गेवराई, जि. बीड) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून गुन्ह्यातील स्विफ्ट डिझायर कार आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. ▮ पान ४ वर

### युट्यूबवरून शिकले गुन्ह्याची पद्धत

आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची धक्कादायक कबुली दिली. झटपट पैसे कमावण्यासाठी त्यांनी युट्यूबवर चोरीच्या क्लृप्त्या पाहिल्या होत्या. ओळख लपवण्यासाठी बनावट सिमकार्ड वापरणे, उबेरवरून गाडी बुक करणे आणि पोलिसांना सुगावा लागू नये म्हणून गाडीचा जीपीएस काढून टाकणे अशा अत्यंत चलाखीने त्यांनी हा गुन्हा केला होता. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीची कार आणि गुन्ह्यात वापरलेले साहित्य हस्तगत केले आहे.

### पथकात यांचा सहभाग

सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि हेमंत थोरात, पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, पोकॉ दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात करत आहेत.

# ‘एक विद्यार्थी - एक वृक्ष’ संकल्पातून हिरवेगार अहिल्यानगर घडविण्याचा निर्धार - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

## ग्रीन सिटी मोहिमेतून विद्यार्थ्यांचे वृक्षरोप देऊन अनोखे स्वागत । ‘वृक्ष : आदर्श व्यक्ती’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद; शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ उभी करत शहराला हरित भविष्य देण्याच्या उद्देशाने उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत ‘‘वृक्ष : आदर्श व्यक्ती’’ हा अभिनव उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथील विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्याच दिवशी देशी वृक्षांच्या रोपांनी अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी प्रतीकात्मक स्वरूपात १०० विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची रोपे भेट देण्यात आली. स्वागताची ही आगळीवेगळी आणि पर्यावरणपूरक भेट मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि समाधानाचे भाव स्पष्टपणे दिसून येत होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तकांसोबत वृक्षसंवर्धनाचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, ‘‘ नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत शहरभर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य सुरू आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वाढत्या तापमानाला आळा घालण्यासाठी वृक्ष लागवड हा एकमेव प्रभावी पर्याय आहे. त्यामुळे या मोहिमेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना देशी वृक्षांची रोपे देण्यात येणार आहेत.

ते पुढे म्हणाले की, ‘‘विद्यार्थ्यांनी ही रोपे केवळ घरी नेऊन ठेवू नयेत, तर आपल्या घराच्या परिसरात, मोकळ्या जागेत किंवा उपलब्ध ठिकाणी लावून त्यांचे जतन आणि संवर्धन करावे. ज्या प्रकारे आपण आपल्या आदर्श व्यक्तीचा सन्मान करतो, त्याचप्रमाणे वृक्षालाही आदर्श मानून त्याची काळजी घ्यावी. वृक्ष आपल्याला सावली, प्राणवायू, फळे, पर्यावरणीय संतुलन आणि जीवन देतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

वाढत्या तापमानाबाबत चिंता व्यक्त करताना ॲड. जाधव म्हणाले की, ‘‘दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानाच्या संकटापासून मानवजातीचे संरक्षण करण्याची क्षमता केवळ वृक्षांमध्येच आहे. सिमेंटच्या जंगलांमध्ये हरित क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. ▮ पान ४ वर

# खाकीला डाग लावलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना नगर जिल्हा सुटेना!

## बदल्या झालेल्या पोलिस अधिकाऱ्यांना जिल्ह्यातून हटवा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर जिल्ह्याबाहेर बदल्या होऊनही काही अधिकाऱ्यांना नगर जिल्हा काही सुटेना झाला आहे. नगर जिल्ह्यातच पुन्हा राहण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांकडून फिल्डींग लावल्याचे सांगितले जात असून अशा अधिकाऱ्यांना नगर जिल्ह्यातून हटवा असे म्हणण्याची आता वेळ आली आहे.

नाशिक विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संजय यनपुरे यांनी नाशिक विभागांतर्गत (रेंज) १४ सहाय्यक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचे दि. ३१ मे रोजी गॅझेट प्रसिध्द केले. त्यामध्ये ६ जणांना जिल्ह्यातच मुदतवाढ देण्यात आली तर ८ अधिकाऱ्यांना जिल्ह्याबाहेरचा रस्ता दाखविण्यात आला आहे. बदलीचे गॅझेट प्रसिध्द होऊन १५ दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र अद्यापही बदली झालेल्या अधिकाऱ्यांना जिल्हा सोडवत नसल्यासारखी परिस्थिती आहे.

विशेष म्हणजे या अधिकाऱ्यांपैकी काहींनी खाकीला डाग लागेल असे वर्तन केलेले असून त्यांच्यावर वरिष्ठांनी कारवाई देखील केली आहे. मात्र बदल्या झालेल्या अधिकाऱ्यांना अद्याप नगर जिल्ह्यातच काम करावेसे वाटत आहे. विशेष म्हणजे नकतेच पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलिस निरीक्षक व सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या असून पोलिस ठाणेदारांच्या नेमणुका केल्या आहेत. याच पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना भेटून पुन्हा नगर जिल्ह्यातच काम करण्यासाठी अनेकांची धडपड सुरु असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या बदल्या झालेल्या अधिकाऱ्यांना जिल्ह्याबाहेरचा रस्ता दाखवा अशी पोलिस दलातून मागणी होत आहे.

### मुळेंच्या मेहरबानीतून एलसीबीसह पोलिस ठाण्यात घुसखोरी करणाऱ्यांना हिसका दाखवा

यापूर्वीचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मित्र व खासगी व्यक्ती असलेल्या मुळेला हाताशी धरुन ९ कर्मचाऱ्यांनी एलसीबीसह पोलिस ठाण्यात घुसखोरी केली आहे. त्यामुळे या ९ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याही वादाच्या भोवऱ्यात सापडल्या होत्या. घार्गे यांनी जाता–जाता या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्या ९ जणांविरोधात वरिष्ठ पातळीवरीही तक्रारी झाल्या आहेत. विशेष म्हणजे हे कर्मचारी वादग्रस्त आहेत. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी या ९ जणांना कारवाई करुन नगर शहराबाहेर पाठवावे अशीही मागणी पोलिस वर्तुळातून होत आहे.

## दै. आकर्षण निवडक

### मुंढे यांच्या अन्न भेसळीविरोधी मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी 'फूडिसीन पाल्स' अभियान

अहिल्यानगर- महाराष्ट्रातील प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि धाडसी प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळख असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न भेसळीविरोधात सुरू केलेल्या व्यापक आणि कठोर कारवाईचे राज्यभरातून स्वागत होत आहे. त्यांच्या या मोहिमेला जनआंदोलनाचे स्वरूप देण्यासाठी पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने 'फूडिसीन पाल्स' हे राज्यव्यापी जनजागृती व लोकनिरीक्षण अभियान सुरू करण्यात येत आहे.पीपल्स हेल्पलाइनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, अन्न भेसळीविरोधातील लढा केवळ शासकीय यंत्रणेचा किंवा एखाद्या अधिकाऱ्याचा विषय राहू नये. महाराष्ट्रातील युवक, नागरिक, सामाजिक संघटना आणि ग्राहक यांनी सक्रिय सहभाग घेऊन ही लढाई लोकचळवळ बनविणे ही काळाची गरज आहे. राज्यातील बाजारपेठांमध्ये विक्री होणाऱ्या भाज्या, फळे, दूध, खाद्यतेले, मसाले, मिठाई, धान्य आणि विविध खाद्यपदार्थांमध्ये रासायनिक पदार्थ, कृत्रिम रंग आणि घातक घटकांची भेसळ केली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. ही केवळ ग्राहकांची आर्थिक फसवणूक नसून, जनतेच्या आरोग्यावर आणि भावी पिढ्यांवर होणारा गंभीर आघात आहे, असे पीपल्स हेल्पलाइनने म्हटले आहे.संघटनेच्या मते, कॅन्सर, मधुमेह, किडनीचे विकार, यकृताचे आजार आणि इतर अनेक गंभीर आजारांच्या वाढत्या प्रमाणामागे दूषित आणि भेसळयुक्त अन्न हा महत्त्वाचा घटक ठरत आहे. 'फूडिसीन' म्हणजे शुद्ध अन्न, सुरक्षित शेती आणि आरोग्यदायी जीवनशैली यांची त्रयी होय. ही त्रयी मानवी आरोग्य, पर्यावरण आणि शेती व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवू शकते, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या अभियानासाठी ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी यांच्यासह अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. राज्यभर या अभियानाचा विस्तार करण्यासाठी नियोजन सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

### रुग्णसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल चिवटे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

अहिल्यानगर - समाजातील गोरगरीब, सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांसाठी अहोरात्र कार्यरत राहून ''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा'' हा विचार कृतीतून जपणारे ज्येष्ठ समाजसेवक तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांचे विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) मा. श्री. मंगेशजी चिवटे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन चिवटे साहेबांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या वैद्यकीय, सामाजिक आणि जनकल्याणकारी कार्याचा यावेळी उपस्थित मान्यवरांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या मूळ संकल्पनेचे शिल्पकार, तत्कालीन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे माजी कक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे कक्षप्रमुख, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात आला.

### सुभद्रा फलके यांचे निधने



अहिल्यानगर - यशवंत कॉलनी येथील रहिवासी कै. आमदार पांडुरंग यशवंत पालखी गुरुजी यांच्या स्नुषा गं. भा. सुभद्रा शरदचंद्र फलके (सुभद्रा वहिनी) यांचे रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्या धार्मिक वृत्तीच्या व अत्यंत मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या.त्यांच्या पश्चात नागपूर खंडपीठातील उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती उर्मिला फलके-जोशी, कन्या अर्चना फलके, पुत्र व बांधकाम व्यावसायिक मयूर फलके, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे मूळ गाव फलकेवाडी असून त्यांच्या निधनाने अहिल्यानगर शहर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अंत्यविधीस आमदार नरेंद्र घुले-पाटील, ॲड. विश्वासराव आठरे पाटील, ॲड. वसंतराव कापरे, ॲड. सुभाष भोर यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, विधी व बांधकाम क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते जल्लोषात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी आणि शिक्षणाविषयी गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने राहुरी मतदारसंघाचे आमदार अक्षय कर्डिले यांनी जिल्हा परिषद मराठी शाळा, बुऱ्हानगर येथे भेट देत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रथमच शाळेत प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच फुलांची उधळण करून आणि टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळा परिसरात आनंददायी आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील निरागस आनंद आणि पालकांचा उत्साह पाहण्यासारखा होता. शिक्षणाच्या प्रवासाची सुरुवात सकारात्मक वातावरणात व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आत्मीयता निर्माण व्हावी, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले म्हणाले, आजची ही चिमुकली मुले उद्याचा भारत घडविणारी पिढी आहे. शिक्षण हेच यशाचे आणि प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने मोठी स्वप्ने पाहावीत, मेहनतीने अभ्यास करावा आणि आपल्या आई-वडिलांसह गावाचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत. शाळेच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या आगळ्यावेगळ्या स्वागतामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

### प्रा. ज्ञानदेव बेरड यांच्या आर्थिक सहकार्यातून

## तरडगव्हाण जि. प. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तरडगव्हाण, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर सोमवार (दि. १५) रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरडगव्हाण येथे सकाळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमासाठी गावचे सुपुत्र प्राध्यापक ज्ञानदेव बेरड सर यांनी आर्थिक सहकार्य केले. शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष गणेशराव बेरड पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी यशस्वीपणे झाली.

प्रा. बेरड सर यांची मनातील तगमग अशी आहे की, गावातील एखादा विद्यार्थी आयएएस होऊन वरिष्ठ अधिकारी व्हावा. ते स्वतः या शाळेमध्ये शिक्षण घेऊन आज प्राध्यापक पदावर पोहोचले आहेत.

सकाळी झालेल्या वाटपात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, दप्तर व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नवीन साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर आनंद दिसून आला.

या प्रसंगी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रा. ज्ञानदेव बेरड सर व गणेश राव बेरड पाटील यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

प्रा. ज्ञानदेव बेरड सर म्हणाले, गावच्या मुलांनी मोठे व्हावे, शिक्षणाने प्रगती करावी हीच अपेक्षा. पालकांनीही मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे.

मुख्याध्यापकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल प्रा. बेरड सर, अध्यक्ष गणेशराव बेरड पाटील, सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थांचे आभार मानले.

## पावसाने दडी मारली; पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर –** जून महिना अर्ध्यावर आला तरीही पारनेर तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे. दरवर्षी याच काळात शेतकरी पेरणीच्या तयारीला लागतो, मात्र यंदा आकाशात ढग दिसतात आणि क्षणात नाहीसे होतात. त्यामुळे ''पाऊस कधी बरसणार?'' हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

पावसाने अद्याप दडी मारल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. काही ठिकाणी तुरळक सरी कोसळल्या असल्या तरी खरीप हंगामाला चालना देणारा दमदार पाऊस अद्याप झालेला नाही. परिणामी पेरणीची कामे खोळंबली असून शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा उन्हाळा तीव्र असल्याने अनेक भागांतील विहिरी, बोअरवेल आणि पाणवठ्यांची पाणीपातळी घटली आहे. त्यातच पाऊस लांबल्यास गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या उपलब्ध असलेला हिरवा चारा मर्यादित असून पाऊस आणखी उशिरा झाल्यास पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहू शकते.

हवामान खात्याने लवकरच मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी शेतकरी मात्र प्रत्यक्ष पावसाचीच वाट पाहत आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या बळीराजाची नजर आता आकाशाकडे खिळून राहिली असून ''एकदा का दमदार पाऊस झाला, की शेतात जीव येईल,'' अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. पारनेर तालुक्यातील शेती आणि पशुधनाचे भवितव्य आता येत्या काही दिवसांतील पावसावर अवलंबून असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

## बालकामगारमुक्त समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी योगदान द्यावे - आ. संग्राम जगताप

### जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त शहरात जनजागृती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक बालकामगार विरोधी दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात बालकामगार प्रथा निर्मूलन व बालहक्क संरक्षणाबाबत व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाचे प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते माहिती पत्रकाचे अनावरण करुन करण्यात आले. या अभियानाचे आयोजन कामगार विभाग, चाईल्ड लाईन, विपला फाउंडेशन तसेच विविध शासकीय विभागांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

जागतिक बालकामगार विरोधी दिन हा बालकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देणे आणि बालशोषणाविरुद्ध समाजात जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी नागरिक, प्रवासी, कर्मचारी व अधिकारी यांच्यामध्ये जनजागृती करण्यात आली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, बालकामगारमुक्त समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. तसेच बालकांचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि सर्वांगीण विकास यासाठी समाजातील प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारण्याचे त्यांनी आवाहन केले.

या उपक्रमाची सुरुवात अहिल्यानगर रेल्वे स्थानक परिसरातून करण्यात आली. यावेळी कामगार विभागाचे अधिकारी, लोहमार्ग पोलीस, चाईल्ड लाईनचे प्रतिनिधी तसेच विपला फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. रेल्वे स्थानकावर येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना बालकामगार प्रथेचे दुष्परिणाम, बालकांचे कायदेशीर हक्क, बालमजुरी रोखण्यासाठी नागरिकांची भूमिका याबाबत माहिती देण्यात आली. तसेच बालकामगार आढळून आल्यास संबंधित यंत्रणांना तत्काळ कळविण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर पुणे बसस्थानक परिसरात बस नियंत्रण कक्षातील कर्मचारी, वाहतूक कर्मचारी, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या सहभागातून जनजागृती करण्यात आली. बसस्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी अनेक वेळा बालमजुरी, बालशोषण व बालतस्करीची प्रकरणे आढळून येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांबाबत सतर्क राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.

याशिवाय अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक गायकवाड यांच्या उपस्थितीत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. बालकामगार, बालशोषण व बालसुरक्षेसंदर्भातील कायदेशीर तरतुदींबाबत माहिती देण्यात आली. पोलीस प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून बालहक्क संरक्षणासाठी प्रभावी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बाल कल्याण समिती, अहिल्यानगर येथे समितीचे अध्यक्ष ओहोळ यांच्या समवेत जनजागृती करण्यात आली. बालकांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या विविध यंत्रणांच्या भूमिकेबाबत माहिती देण्यात आली. बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांच्या उपस्थितीतही जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली तसेच बालहक्कांच्या संरक्षणासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांचे महत्त्व सांगण्यात आले.

### नेप्ती विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी बाबा भोरसर

## नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने बाबा भोरसर यांचा सत्कार करून सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री. स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापकपदी बाबा लक्ष्मण भोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्याच शाळेच्या सर्वोच्च शैक्षणिक पदावर विराजमान होण्याचा मान त्यांना मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने उपसरपंच एकनाथ जपकर, संस्थेचे उपाध्यक्ष अर्जुन होळकर व रामदास फुले यांच्या हस्ते नवे प्रभारी मुख्याध्यापक बाबा भोर सर यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सरपंच दिलीप होळकर , संस्थेचे उपाध्यक्ष अर्जुन होळकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, हनुमंत साळवे ,माजी चेअरमन विलास जपकर, प्रभारी मुख्याध्यापक बाबा भोर ,नानासाहेब घोडके, राजेंद्र झावरे, संतोष खरमाळे, बाबुलाल सय्यद, राधा वामन, सविता कोरडे शिक्षक व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाबा भोर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. आर्थिक अडचणींवर मात करत मिळेल ते काम करून त्यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली होती. शिक्षणाची जिद्द, परिश्रमाची तयारी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांनी कला शिक्षक म्हणून कार्य करताना विद्यार्थ्यांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थेने त्यांच्यावर प्रभारी मुख्याध्यापकपदाची जबाबदारी सोपविली आहे.

भोर सर यांचा जीवनप्रवास हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घेतले, संघर्ष केला आणि आज ते ज्या शाळेत विद्यार्थी म्हणून घडले त्याच शाळेचे मुख्याध्यापक झाले आहेत.

## श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत नवागतांचे उत्साहात स्वागत

### फुगे आकाशात झेपावले, मोफत पाठ्यपुस्तके व रोपवाटपाने शैक्षणिक वर्षाचा मंगलारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नवीन गणवेश परिधान करून मैदानात शिस्तबद्ध रांगेत बसलेले विद्यार्थी, चेहऱ्यावर झळकणारे निरागस हास्य, आकर्षक सजविलेल्या वर्गखोल्या, विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी सज्ज शिक्षकवृंद आणि उत्सुकता व आनंदाने चैतन्यमय झालेला शाळेचा परिसर... असे मनोहारी चित्र सावेडी येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेच्या प्राथमिक विभागात पाहायला मिळाले. निमित्त होते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या नवागत विद्यार्थी स्वागत समारंभाचे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी तथा शालेय समितीचे चेअरमन सुरेश क्षीरसागर होते. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक ऋग्वेद गंधे उपस्थित होते. याशिवाय पालकमंत्री ग्रीन सिटी सदस्य कैलास दिघे तसेच समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

संगीत शिक्षिका सौ. खणकर यांनी सादर केलेल्या ईशस्तवन व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या उत्साहात भर घालत आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून नवीन शैक्षणिक वर्षाचे जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी प्रास्ताविकात नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी सर्व विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थिती, शिस्त, स्वच्छता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संकल्प करून यशाच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख अतिथी ऋग्वेद गंधे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''या शाळेने देशाला अनेक मोठे हिरे दिले आहेत. आता ती जबाबदारी तुमच्यावर आहे. शाळेच्या गौरवशाली परंपरेचा विचार करून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर शाळेचे नाव अधिक उंचावावे.'' यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रशालेतील प्रत्येक विद्यार्थ्याला मोफत रोपांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रत्येक वर्गशिक्षकाने आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे हसतमुखाने स्वागत केले. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाध्यक्ष सुरेश क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, शाळा यावर्षीदेखील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणार असून त्यातून प्रत्येक विद्यार्थ्याचा शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि वैयक्तिक अशा सर्व स्तरांवर सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गीतांजली शेरकर यांनी केले. वृषाली कुलकर्णी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला, तर अश्विनी जाधव यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांच्या आनंदी चेहऱ्यांनी, शिक्षकांच्या उत्साहपूर्ण सहभागाने आणि विविध उपक्रमांनी सजलेल्या या स्वागत समारंभामुळे श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रेरणादायी आणि संस्मरणीय प्रारंभ झाला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सावेडीत शनिवारपासून तुलसी रामायण कथेस प्रारंभ



अहिल्यानगर- चिन्मय अमृत महोत्सवी वर्षा निमित्त अहिल्यानगर चिन्मय मिशन द्वारा आयोजित सुंदरकांड तुलसी रामायण कथेचा सावेडी येथील माऊली सभागृह येथे शनिवार दि. २० जून पासून प्रारंभ होत आहे. अशी माहिती नगर शाखेचे अध्यक्ष ॲड.धोंडीराम घोरपडे यांनी दि. परमपूज्य स्वामी अद्वैतानंद सरस्वती यांच्या पावन अमृत वाणीतून स्त्रवणाऱ्या कथा श्रवणाची संधी अहिल्यानगर मधील नागरिकांना होत असून शनिवार दि. २० जून ते गुरुवार दि. २५ जून पर्यंत ही कथा दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. प्रवेश विनामूल्य आहे.तरी त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा.असे आवाहन सचिव देवराम मोरे यांनी केले आहे. या कथा सोहळ्यास चिन्मय मिशनचे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती उपस्थित राहणार आहेत. तुलसी रामायण कथा,रामचरितमानस मधील सुंदरकांड हे श्रीराम - भक्त हनुमान यांचे माहात्म्य गुण,प्रभाव व लीला यांचे वर्णन सांगितले आहे.कलियुगाच्या सर्व दोषांचा परिहार सुंदर कांडाचे श्रवण - पठणाने होतो. हनुमंताची भक्ती म्हणजे रामकृपेची प्राप्ती होते,असा या सुंदरकांडाचा सार आहे. तरी त्याचा लाभ अहिल्यानगर मधील नागरिकांनी घ्यावा.असे स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी सांगितले.

### ‘जिंदगी प्यार का गीत है’ कार्यक्रमात लकी ड्रॉची रंगत




अहिल्यानगर- असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) आणि श्री पूजा इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ‘जिंदगी प्यार का गीत है’ या बहारदार ऑर्केस्ट्रा म्युझिकल धमाल कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगीत, मनोरंजन आणि विविध आकर्षक उपक्रमांनी सजलेल्या या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या लकी ड्रॉ सोडतीने विशेष रंगत आणली. कार्यक्रमादरम्यान काढण्यात आलेल्या लकी ड्रॉमध्ये हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य अशोक पराते हे भाग्यवान विजेते ठरले. सोडतीद्वारे त्यांना आकर्षक पैठणी साडीचे बक्षीस प्रदान करण्यात आले. बक्षीस जाहीर होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. सत्कार प्रसंगी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, ताराचंद ठोकळ, संजय भिंगारदिवे, जालिंदर अळकुटे, अविनाश जाधव, नवनाथ वेताळ, शिवांग शिंदे, ज्योतीताई भिंगारदिवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी अशोक पराते यांचे अभिनंदन केले.‘जिंदगी प्यार का गीत है’ या संगीत मैफलीने जुन्या-नव्या गाण्यांचा सुरेल संगम घडवत रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमातील कलाकारांच्या दमदार सादरीकरणामुळे उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला. त्यातच लकी ड्रॉच्या उपक्रमामुळे कार्यक्रमात रंगत आनली.

### बीड ते मंत्रालय लाँग मार्च अहिल्यानगरमध्ये दाखल

अहिल्यानगर- अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान सुरू असलेला लाँग मार्च अहिल्यानगर शहरामध्ये दाखल झाले असता लाँग मार्च चे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिंगारे यांचा सत्कार करून समस्त भीमसैनिकांनी जल्लोषात स्वागत केले. शहरातील विविध सामाजिक संघटना, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्चला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली मार्च मध्ये सहभागी होणाऱ्या भीमसैनिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यावेळी हजारो भीमसैनिकांनी एकजुटीचा निर्धार व्यक्त करत उपवर्गीकरणाच्या विरोधातील आंदोलनाला भक्कम पाठिंबा दर्शविला यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, निवृत्ती आरू, अमित काळे, प्रा.जयंत गायकवाड, एन एम पवळे, विशाल गायकवाड, समीर भिंगारदिवे, आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## स्पर्धा परीक्षेसाठी हिंद सेवा मंडळ नेहमी विद्यार्थ्यांना सहकार्य करेल- ॲड. अनंत फडणीस



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या सिताराम सारडा विद्यालयाचा राज्यस्तरीय सी. व्हि.रमण परीक्षेचा विद्यालयाचा निकाल १००% लागला. विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत येऊन विद्यालयाचे व संस्थेचे नाव मोठे केले आहे. या मुलांच्या शैक्षणिक भविष्यासाठी हिंद सेवा मंडळ सदैव तत्पर असेल असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना फडणीस यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष श्री सुमतीलालजी कोठारी विद्यालयाचे चेअरमन श्री. अजित बोरा, डॉक्टर पारस कोठारी ,श्रीम. ज्योती कुलकर्णी माजी मुख्याध्यापक श्री. मुदगल सर विद्यालयाचे विद्यमान मुख्याध्यापक श्री अशोक डोळसे, पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर, मार्गदर्शक शिक्षिका श्रीम. क्रांती मुंदानकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सुमतीलाल कोठारी यांनी विद्यालय विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त उपक्रम राबवीत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे विद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून, आधुनिक साहित्यांचा अध्यापनासाठी उपयोग करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील असतात. अजित बोरा यांनी आपल्या मनोगतामध्ये पुढील वर्षापासून विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी मी सहकार्य करील असेच मोठे यश संपादन करून विद्यालयाचे व आपल्या पालकांचे नाव मोठे करा हे आवर्जून सांगितले डॉक्टर पारस कोठारी यांनी यशासाठी कोणताही शॉर्टकट नसून तुम्ही सातत्याने प्रयत्न करून मिळविलेले यश हे कायम टिकणारे असते म्हणून सातत्याने अभ्यास करूनच यश प्राप्त करा अशा शुभेच्छा दिल्या. ज्योती कुलकर्णी यांनी अभ्यास करण्याच्या विविध सोप्या पद्धती विद्यार्थ्यांना सांगतानाच सातत्याने नवनवीन शिकण्याचा प्रयत्न करा त्यातूनच तुमचा बौद्धिक विकास घडेल. माजी मुख्याध्यापक मुदगल यांनी आपल्या शुभेच्छा मध्ये विद्यार्थ्यांसाठी विद्यालय खूप काही नावीन्यपूर्ण करीत आहे. त्याबद्दल सर्व शिक्षकांना आणि शाळेचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आता स्वतः प्रयत्न करून विविध स्पर्धा - परीक्षा यामध्ये सहभागी होऊन यश मिळवावे. त्यासाठी आपल्या विद्यालयातील शिक्षक तुम्हास मार्गदर्शन करण्यास सदैव तत्पर असतील. परीक्षा मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती मुंदकर यांनी परीक्षेसंबंधी माहिती सर्वांना सांगितली.

यावेळी हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अनंत फडणीस यांचा वाढदिवसानिमित्त विद्यालयामार्फत विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका व सर्व मान्यवरांनी सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी केले तर सर्व मान्यवरांचे आभार पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर मॅडम यांनी मानले.

## ज्ञानदीप प्रज्वलित करणारा उपक्रम : पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टतर्फे ४०० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शिक्षण हा समाज परिवर्तनाचा पाया असून ज्ञानरूपी प्रकाश प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात झळकावा, या उदात्त ध्येयाने पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती यांच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांसाठी वही वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. यावर्षीही या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ४०० गरजू, होतकरू व जिद्दी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना नवी दिशा, नवी उमेद आणि नवचैतन्य देण्यात आले.

उपक्रमाची सुरुवात गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिरात भक्तिमय वातावरणात महाआरतीने करण्यात आली. त्यानंतर तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजीनगर, रंगारगल्ली, चितळे रोड, श्रमिकनगर, पद्मानगर, नित्य सेवा, सिव्हिल हाडको, शिमला कॉलनी, नागरदेवळे आणि भिंगार परिसरातील विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन वह्यांचे वाटप करण्यात आले.

वही ही केवळ कागदांची बांधणी नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारी, ज्ञानाच्या वाटेवर दिशा दाखविणारी आणि उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारी अमूल्य शिदोरी आहे. अनेक कुटुंबांमध्ये शैक्षणिक साहित्याची कमतरता विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या आड येत असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या हातात पोहोचणारी प्रत्येक वही ही त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारी, शिक्षणाची ओढ वाढविणारी आणि यशस्वी भवितव्याची बीजे पेरणारी ठरते. ज्ञानदानाच्या या पवित्र कार्यातून अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या सामाजिक उपक्रमासाठी समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी उदार हस्ते आर्थिक सहकार्य करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी दर्शन घडविले. यामध्ये विशाल गाजुल, प्रवीण कट्टा, ओम राजेश कुरापाटी, सुभाष व्यंकटेश वल्लाकटी, विजय शेराल, म्याना चंद्रकांत, संतोष शिरापुरी, मल्लिकार्जुन इराबत्तिन, दिगंबर नोमुल, विश्वनाथ कट्टा, तुषार बुर्ला, दत्तात्रय नल्ला (पुणे), संजय रामलाल आडेप, गोपाल मंगलारप, गणेश जिंदम, किशोर पवार, दत्तात्रय जोग, प्रभाकर लाखापती, शोभा अशोक भोर (अकोळनेर), कृष्णा अर्जुन कोडम, नरेश कोटा, श्रीनिवास बोड्डू, विठ्ठल मच्चा (पुणे), भीमकाका सिरसूल, दत्तात्रय नारायणराव न्यालपेल्ली, अमर कोडम (नाशिक), कविता प्रकाश कोमार, संतोष आडेप, संतोष बुचय्या दुलम, वंदना प्रमोद रामदिन, संजय मंगलारप, सागर आरकल, कृष्णा पेंडम, मुनेश म्याना, उमा बडगु, डॉ. साईनाथ चिंता, पराग डेरेकर तसेच नाव प्रसिद्ध न करण्याची इच्छा व्यक्त केलेल्या काही दात्यांचा समावेश आहे.

## पाचोड पोलिसांचा धडाकेबाज ॲक्शन; दोन आरोपी जेरबंद

**तीन महिन्यांपासून शेतकऱ्यांना त्रस्त करणाऱ्या केबल चोरट्यांचा पर्दाफाश; आणखी आरोपींचा शोध सुरू**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** गेल्या तीन महिन्यांपासून पाचोडसह परिसरातील शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरलेल्या विद्युत केबल चोरी प्रकरणाचा अखेर पाचोड पोलिसांनी यशस्वी छडा लावला आहे. मंगळवारी (दि. १६) पहाटे सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले. आकाश कैलास शिंदे (वय १९, रा. शुरबंगला, ता. वैजापूर), अमोल मिठू माळी (वय २६, रा. मुरमा, ता. पैठण) अशी आरोपींची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, मागील तीन महिन्यांपासून परिसरातील शेतांमधील बोरवेल, विहिरी आणि विद्युत मोटारींना पुरवठा करणाऱ्या केबलची सातत्याने चोरी होत होती. त्यामुळे शेकडो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. मोटारी बंद पडणे, पिकांना वेळेवर पाणी न मिळणे तसेच नवीन केबल बसवण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.



परिसरात जवळपास दररोज वेगवेगळ्या शिवारांमध्ये चोरीच्या घटना घडत होत्या. चोरटे रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत शेतांमध्ये प्रवेश करून बोरवेल व विहिरींना जोडलेल्या विद्युत मोटारींच्या केबल कापून पळ काढत होते. या चोरीमुळे केवळ आर्थिक नुकसानच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामावरही मोठा परिणाम होत होता.

अनेक शेतकऱ्यांनी याबाबत पाचोड पोलीस ठाण्यात तक्रारी नोंदवल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाला प्राधान्य देत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सोमवारी (दि. १५) सायंकाळी पाचोड पोलिसांना गोपनीय सूत्रांकडून महत्त्वाची माहिती मिळाली. विद्युत केबल चोरी करणारे दोन संशयित तरुण छत्रपती संभाजीनगर शहरात असल्याची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पंडित यांनी वेळ न दवडता विशेष पथक रवाना केले.

पोलीस कर्मचारी ताराचंद घडे, विष्णू सानप, विलास घुगरे यांनी पहाटे छत्रपती संभाजीनगर गाठून सेंट्रल नाका परिसरात सापळा रचला. मंगळवारी पहाटे दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना पाचोड पोलीस ठाण्यात आणून कसून चौकशी करण्यात आली. पोलिसांच्या दमदार चौकशीपुढे आरोपींनी पाचोड परिसरातील अनेक केबल चोरी प्रकरणांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. मंगळवारी दुपारी आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने दोघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, आरोपींकडून चोरीतील मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरू असून या गुन्ह्यात आणखी काही आरोपींचा सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## आपल्या मुलीला लस देत डॉ. सखुताई झारगड यांनी घालून दिला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे, यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचा शुभारंभ मंगळवारी प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळवाडी येथे करण्यात आला. या मोहिमेची सुरुवात पंचायत समिती सदस्य डॉ. सखुताई झारगड यांनी आपल्या मुलीला एचपीव्ही लस देऊन केली. स्वतःच्या मुलीचे लसीकरण करून त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला.

त्यामुळे पालकांमध्ये लसीकरणाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला असून मोहिमेबाबतचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. यावेळी बोलताना डॉ. झारगड यांनी पालकांनी कोणत्याही अफवा किंवा गैरसमजांना बळी न पडता पात्र मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले. एचपीव्ही लस ही गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी प्रभावी असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आगाज, पंचायत समिती सदस्य भारत मुकुटमल, डॉ. भारत झारगड यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. लसीकरण मोहिमेची व्यापक जनजागृती करून अधिकाधिक लाभार्थींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले.

## सद्गुरू ओंकारबाबा विद्यालयाचा पारनेर तालुक्यात डंका !

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** तालुक्यातील किन्ही येथील रयत शिक्षण संस्थेचे , सद्गुरू ओंकारबाबा माध्यमिक विद्यालय गुणवत्तेत नेहमीच अव्वल स्थानी राहत आले असून , दहावीच्या १०० % निकालाची उज्ज्वल परंपरा विद्यालयाने याही वर्षी अबाधित ठेवली असल्याचे प्रतिपादन शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांनी १५ जुन रोजी पार पडलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तके वितरण समारंभ प्रसंगी केले.

पुढे बोलताना देठे पाटील म्हणाले की विद्यालयाच्या २०२५ - २०२६ या वर्षीच्या दहावीच्या जवळपास सर्वच विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह गुण मिळवत विद्यालयाला तालुक्यात नावलौकिक प्राप्त करून दिला आहे.तसेच ९१ % गुण मिळवत वैष्णवी आतकर या विद्यार्थिनीने इतिहास घडवला आहे. त्यामुळे या वर्षीपासून विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा मोठा कल वाढला असून ,विद्यालयाच्या गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस उंचावण्यासाठी सर्वच शिक्षक शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी विद्यालयाचे शिक्षक अमोल गवळी सर यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या स्थापनेपासूनच्या यशस्वी वाटचालीवर प्रकाश टाकत विद्यालय गुणवत्तेत पुढे कसे जात आहे हे विस्तृतपणे सांगितले या प्रसंगी विद्यालयाच्या ग्रंथालय, भाषा गणित प्रयोगशाळा व ग्रंथ दालनाचा शुभारंभ करण्यात आला तसेच विद्यालयात नव्याने दाखल झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे उपस्थितांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.या दरम्यान किन्हीतील युवक रमेश खरात , पै.दत्ता घोडके , शुभम मुळे यांनी गरजु विद्यार्थ्यांना पेन व वह्यांचे मोफत वाटप केले.

या वेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य विठ्ठल खोडदे , चेअरमन दिलीपराव खोडदे, प्रभाकर परांडे ,प्रभारी मुख्याध्यापिका ज्योती ठुबे , अमोल गवळी सर , दिपीका बच्छाव , रामदास सावंत , संपत खोडदे, योगेश किनकर , बाळासाहेब भांड ,नानासाहेब आतकर,विकास खोडदे, जयदिप मुळे , भाऊसाहेब व्यवहारे , संजय व्यवहारे , बाळू निमसे , आप्पासाहेब रोडे , संतोष खोडदे,सुधीर घुले , कल्याणी घुले , रेखा खोडदे, रूपाली आतकर आदी पालक उपस्थित होते.



**सद्गुरू ओंकारबाबा माध्यमिक विद्यालय अतिशय ग्रामीण भागात असल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागतो परंतु आम्ही त्यावरही मात करत विद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व शिक्षक सातत्याने मेहनत घेत असतो त्यामुळेच विद्यालयाचे दहापैकी आठ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. तसेच वेगवेगळ्या स्पर्धा व शिष्यवृत्ती परिक्षांमध्ये देखील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित करत विद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे.**

**श्रीमती ज्योती ठुबे, प्रभारी मुख्याध्यापिका**

## लायन्स युवा सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमात अहिल्यानगरच्या चार लिओ सदस्यांची आंतरराष्ट्रीय निवड

**जिनेश छाजेड, आरजाकौर वधवा, ओम भंडारी व सई काळे यांचा समावेश नॉर्वे, स्पेन व जर्मनी येथे जाण्याची संधी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लायन्स युवा सांस्कृतिक देवाणघेवाण (लायन्स युथ एक्सचेंज प्रोग्राम) उपक्रमाला यंदा विशेष यश मिळाले असून, प्रथमच शहरातील चार लिओ सदस्यांना विविध युरोपीय देशांतील आंतरराष्ट्रीय युवा देवाणघेवाण शिबिरांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

यापूर्वी गेल्या तीन वर्षांपासून लायन्स क्लब ऑफ अहमदनगरने या कार्यक्रमांतर्गत विविध देशांतील युवा प्रतिनिधींना अहिल्यानगरमध्ये होस्ट करून भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली होती. मात्र यंदा प्रथमच क्लबच्या स्वतःच्या लिओ सदस्यांची परदेशातील युवा देवाणघेवाण कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लायन डॉ. संजय असनानी, लिओ क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष लिओ गुरनूरसिंग वधवा तसेच युवा देवाणघेवाण कार्यक्रमाचे अध्यक्ष लायन हरजीतसिंग वाधवा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत जिनेश सुनील छाजेड यांची नॉर्वे, कु. आरजाकौर वधवा यांची स्पेन, तर ओम किरण भंडारी आणि सई ज्ञानेश्वर काळे यांची जर्मनी येथे निवड झाली आहे. निवड झालेल्या युवकांना संबंधित देशांतील यजमान कुटुंबांमध्ये सुमारे १० दिवस होम-स्टेचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असून त्यानंतर ११ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय युवा शिबिरात सहभाग घेता येणार आहे. प्रत्येक शिबिरात जगातील विविध देशांमधील सुमारे ३० युवक-युवती सहभागी होणार असून, त्यांना विविध संस्कृती, परंपरा, भाषा, सामाजिक कार्यपद्धती आणि नेतृत्व विकासाचा अनोखा अनुभव मिळणार आहे.

हा युवा देवाणघेवाण कार्यक्रम लायन्स क्लब्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१-ए२, मुंबई यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे डिस्ट्रिक्ट यूथ एक्स्चेंज चेअरमन लायन दीपेश दोशी हे प्रमुख समन्वयक असून, भारतात येणाऱ्या परदेशी युवकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या इंडिया क्लचरल हेरीटेज कॅम्प या विशेष शिबिराचेही ते नियोजन व समन्वय करतात. या शिबिरामध्ये भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची, इतिहासाची, परंपरांची आणि विविधतेची ओळख जगभरातील युवकांना करून दिली जाते.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप कुलकर्णी, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरनकौर वाधवा, प्रणिता भंडारी आणि सुनील छाजेड यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शन, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अहिल्यानगरच्या युवकांना ही आंतरराष्ट्रीय संधी उपलब्ध झाली. अहिल्यानगरच्या लायन्स आणि लिओ परिवारासाठी हा अभिमानाचा क्षण असून, या युवा प्रतिनिधींमार्फत भारताची संस्कृती, परंपरा आणि मूल्ये जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच या उपक्रमामुळे अहिल्यानगरच्या युवकांना जागतिक स्तरावर मैत्री, नेतृत्व आणि सांस्कृतिक आदानप्रदानाचे नवे क्षितिज खुले झाले आहे.

# जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमातूनच यश संपादन करता येते – किरण काळे

**सामान्य कुटुंबातील मुलीची असामान्य कामगिरी; मुंबई पोलीस भरतीत घवघवीत यश संपादन करणाऱ्या सुप्रिया शिंदेचा ठाकरे शिवसेनेकडून सन्मान**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील सुप्रिया शिंदे यांनी मुंबई पोलीस भरती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येत अथक परिश्रम, जिद्द. चिकाटी आणि सातत्याच्या बळावर त्यांनी हे यश मिळवले आहे. संपादन केलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने महानगर प्रमुख किरण काळे यांच्या हस्ते सुप्रिया शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सुप्रिया हिच्या या यशामुळे केडगावसह संपूर्ण अहिल्यानगरमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निमित्ताने आयोजित विशेष सन्मान सोहळ्यास शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार सेनेचे जयराम आखाडे, माथाडी कामगार संघटक देवराम शिंदे, विजय गायकवाड, प्रशांत कदम, दिपक रोकडे, बाबासाहेब वैरागर, विनोद शिरसाठ, सचिन लोंढे, दिपक काकडे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुप्रिया शिंदे यांच्या यशामागे त्यांचे वडील शांताराम शिंदे आणि आई यांचे मोठे योगदान असून त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी व स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोलाची साथ दिली. सुप्रियांनी दाखविलेली चिकाटी ही आजच्या तरुणाईसाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी किरण काळे यांनी व्यक्त केली.

काळे म्हणाले की, यशाला कोणताही शॉर्टकट नसतो. जिद्द, चिकाटी, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि अथक परिश्रम यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. सुप्रिया शिंदे यांनी सर्वसामान्य कुटुंबातील मुलींनाही मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करता येतात हे दाखवून दिले आहे. त्यांचे यश हे अनेक तरुण-तरुणींसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.

विलास उबाळे म्हणाले, सुप्रियाची यशोगाथा केडगाव परिसरातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या अनेक युवतींना प्रेरित करतील. सामान्य कुटुंबातून येऊन देखील अथक परिश्रमातून असामान्य यश संपादन करते याचा वस्तूपाठ सुप्रियाने भावी पिढी समोर ठेवल्याची भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली. यावेळी सर्व उपस्थितांनी सुप्रिया शिंदे यांचे अभिनंदन करून पुढील कारकिर्दीसाठी उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा दिल्या.

# वसंत रांधवण समाजरत्न पुरस्कार प्रदान

**समता परिषदेतील उत्कृष्ट कार्यासाठी समाजरत्न पुरस्कार**

**दैनिक आकर्षण । संतोष कोरडे**

**पारनेर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथील आधार फाउंडेशन व एस आर २४ न्युज मेडिया समूहाच्या वतीने राज्यातील पत्रकार, आरोग्य, अध्यात्मिक, कृषी शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शनिवार दि.१३ जून रोजी राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथिल आण्णासाहेब शिंदे सभागृहात हा सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६ सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.





यावेळी दैनिक नवा मराठाचे संपादक व अहिल्यानगर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, संपादक सुभाषशेठ गुंदेचा, पै. रावसाहेब (नाना) खेवरे ( जिल्हाध्यक्ष शिवसेना) विजुभाऊ तमनर (जिल्हाध्यक्ष यशवंत सेना), रमेश खेमनर ( आयोजक तथा कार्याध्यक्ष आधार फाउंडेशन), ह.भ.प. राधिकाताई खेमनर (संस्थापक अध्यक्ष – आधार फाउंडेशन),भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य उज्ज्वलताई हाके, रुक्मिणीताई गलांडे ( पोलीस आयुक्त), प्रदिप गोरड (सहायक पोलिस आयुक्त), भाऊसाहेब मोरे (नगराध्यक्ष राहुरी) नगरसेवक संतोष चोळके, शिवाजीराव कपाळे, उपसभापती रामदास बाचकर, आप्पासाहेब हंडाळ (पोलिस निरीक्षक श्रीरामपूर) अहिल्यानगर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. त्याचप्रमाणे राज्यातून विविध क्षेत्रातून आलेले पुरस्कार्थी उपस्थित होते. वसंत रांधवण यांचे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात सामाजिक क्षेत्रात मागिल १७ वर्षापासून सातत्याने भरीव सामाजिक कार्य करत आहेत. तसेच पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील पत्रकार असून निर्भिडपणे ग्रामीण भागातील प्रश्न मांडण्यासाठी विशेष प्रयत्न त्यांनी केले त्यामुळेच त्यांना समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी आधार फाउंडेशन व एस आर २४ न्युजच्या वतीने आयोजक रमेश खेमनर, संस्थेच्या अध्यक्षा हभप राधिकाताई खेमनर यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संयोजक यांनी मोठे प्रयत्न केले. रांधवण यांना समाजरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल तालुक्यातील समता सैनिकांनी तसेच टाकळी ढोकेश्वर परिसरातून अभिनंदन होत आहे.

# ६ वी ते ८ वीवरील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना न्याय द्या

**वेतनश्रेणीबाबत तातडीने शासन निर्णय काढा । शिक्षक परिषदेची शिक्षण मंत्र्यांकडे मागणी । उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रश्न ऐरणीवर – बाबासाहेब बोडखे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण संचालक यांना पाठविले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये नियुक्त प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वेतनश्रेणी मिळावी, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ६९५ शिक्षकांनी दि. १३ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने दि. ८ मे २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत संबंधित शासन निर्णय असंवैधानिक असल्याचे घोषित केले आणि तो रद्द केला. त्यामुळे या प्रश्नाला नव्याने गती मिळाली असून शासनाने आता तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

शिक्षक परिषदेने निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा विषय २०१९ च्या चौथ्या हिवाळी अधिवेशनात विधान परिषद नियम ९३ अन्वये सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान तत्कालीन शालेय शिक्षण मंत्र्यांनी हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी आयुक्त स्तरावर समिती गठित करण्यात आली होती.

आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीने विविध बाबींचा अभ्यास करून शासनाला आपला अहवाल सादर केला आहे. या अहवालात राज्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीमध्ये कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना महाराष्ट्र कर्मचारी वेतन नियमावली १९८१ मधील अनुसूची 'क' नुसार प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. समितीने हा निर्णय केवळ प्रशासकीय दृष्टिकोनातूनच नव्हे, तर नैतिकदृष्ट्याही अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले आहे.

शिक्षक परिषदेच्या मते, प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांकडून उच्च शैक्षणिक पात्रतेच्या आधारे अध्यापनाची जबाबदारी पार पाडली जात असताना त्यांना त्यानुसार वेतनश्रेणी न देणे अन्यायकारक आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे या शिक्षकांच्या मागणीला कायदेशीर आधार मिळाला असून शासनाने आता विलंब न करता वेतनश्रेणी लागू करण्याचा शासन निर्णय जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यभरातील हजारो प्रशिक्षित पदवीधर शिक्षक या निर्णयाकडे आशेने पाहत असून शासनाने न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान करून शिक्षक समुदायाला न्याय द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षकांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर सकारात्मक निर्णय झाल्यास राज्यातील मोठ्या संख्येने शिक्षकांना आर्थिक व सेवाविषयक लाभ मिळणार असल्याचेही परिषदेने स्पष्ट केले असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हंटले आहे.

# 'शिकला तोच घडला'; शिक्षणासाठी वयाचे बंधन नाही – डॉ. पारस कोठारी


**शिक्षण पूर्ण करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विविध कारणांमुळे अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहातील शिक्षणाशी जोडण्याच्या उद्देशाने शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश देण्यात आला.

शाळेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'शिक्षण दूत' मोहिमेअंतर्गत शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, नोकरी करणारे युवक-युवती तसेच विविध व्यवसायांमध्ये कार्यरत असलेले नागरिक यांनी रात्रशाळेतील विविध वर्गांमध्ये प्रवेश घेतला आहे. शिक्षणाची ओढ आणि स्वतः चे आयुष्य अधिक सक्षम करण्याची जिद्द बाळगणाऱ्या या विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्या दिवशी विशेष स्वागत करण्यात आले.

भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ पार पडला. यावेळी प्राचार्य सुनिल सुसरे, महादेव राऊत, अमोल कदम, उज्वला साठे, वृषाली



साताळकर, अनुराधा दरेकर, वैशाली दुराफे, बाळासाहेब गोरडे, संदेश पिपाडा, गजेंद्र गाडगीळ, शिवा शिंदे, कैलास करांडे, गजेंद्र गाडगीळ, मंगेश भुते, अशोक शिंदे, प्रशांत शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील मैत्रीपूर्ण नातेसंबंधातून शिक्षण दिले जाते. या शाळेची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा म्हणजे येथे एकाच वर्गात नवरा-बायको, सुन-सासू, आई-मुलगी तसेच वडील-मुलगा यांनी एकत्र शिक्षण घेऊन यशस्वीरीत्या उत्तीर्ण होण्याची अनेक उदाहरणे आहेत. शिक्षणासाठी कोणतेही वयोमर्यादेचे बंधन नसून शिक्षण घेण्याची इच्छा, जिद्द आणि आयुष्यात पुढे जाण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, रात्रशाळेत केवळ पुस्तकांपुरते शिक्षण दिले जात नाही, तर विद्यार्थ्याला जीवनात सक्षमपणे उभे राहण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन आणि कौशल्य विकासावरही विशेष भर दिला जातो. मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. दिवसभर उपजीविकेसाठी काम करून रात्री शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या कष्टाने शिक्षण पूर्ण करतात. त्यामुळे 'शिकला तोच जीवनात घडला' या उक्तीचा प्रत्यय येथे दररोज येतो. या रात्रशाळेतून शिक्षण पूर्ण केलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांतील उच्च पदांवर कार्यरत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करावे आणि अधिकाधिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी रात्रशाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य सुनिल सुसरे यांनी शाळेत उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन पद्धती तसेच मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची सविस्तर माहिती दिली. दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश भुते यांनी केले, तर आभार गजेंद्र गाडगीळ यांनी मानले. नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, अनंत फडणीस, डॉ. रमेश झरकर आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

**शहरातील एका ६० वर्षीय सराफ व्यावसायिकाचा शिक्षणासाठी प्रवेश**

१९८२ मध्ये दहावी केलेल्या सराफ व्यावसायिक प्रमोद बुऱ्हाडे यांनी आपले अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला आहे. कौटुंबिक जबाबदारी व व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेता आले नसल्याने त्यांनी तब्बल ४४ वर्षांनी पुन्हा इयत्ता ११ वीसाठी प्रवेश घेतला असून, आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याचा निर्धार घेऊन ते शाळेच्या पहिल्या दिवशी देखील हजर होते. यावेळी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# दत्तात्रय गायकवाडांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**खडकवाडी परिसरात पक्षाला नवे बळ**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** बीतालुक्याच्या उत्तर भागातील आदिवासी समाजात मोठा जनसंपर्क असलेले एकलव्य युवा फाउंडेशनचे राज्य सचिव तसेच खडकवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य दत्तात्रय गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला. पारनेर येथील खासदार नीलेश लंके यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात खासदारांचे बंधू दीपक लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

दत्तात्रय गायकवाड हे गेल्या वीस वर्षांपासून खडकवाडी व उत्तर पारनेर भागात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. आदिवासी समाजासह सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या व्यापक जनसंपर्कामुळे आणि तळागाळातील कार्यामुळे उत्तर भागात त्यांचा प्रभावी संपर्क आहे.

शरद पवार यांच्या पुरोगामी विचारांनी तसेच खासदार नीलेश लंके यांच्या विकासाभिमुख कार्याने प्रेरित होऊन आपण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे गायकवाड यांनी यावेळी सांगितले. आदिवासी बांधव व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पक्षप्रवेशासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे प्रमुख अमोल उगले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी संतोष शिंदे, गणेश आग्रे आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष विशाल गागरे यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी दीपक लंके आणि अमोल उगले यांनी दत्तात्रय गायकवाड यांचे पक्षात स्वागत करत त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गायकवाड यांच्या प्रवेशामुळे खडकवाडी व उत्तर पारनेर परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढणार असून आदिवासी समाजाच्या प्रश्नांना अधिक बळकटीने वाचा फुटेल, असा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास जितेश सरडे, बाळासाहेब लंके, संदीप चौधरी, सरपंच अभिजीत झावरे, युवराज पाटील खिलारी यांच्यासह निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

## मोदींच्या विकासदृष्टीला नवी गती; पुणे-शिर्डी रेल्वेसेवेचे सुजय विखे पाटलांकडून स्वागत

डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. दररोज धावणारी ही रेल्वे पुणे, अहिल्यानगर, राहुरी, श्रीरामपूर मार्गे शिर्डीपर्यंत धावणार आहे. त्यामुळे केवळ भाविकांच्याच नव्हे तर विद्यार्थी, रुग्ण आणि व्यावसायिकांच्याही प्रवासाचा वेळ व खर्च कमी होणार आहे. पुण्यातील शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांपर्यंत पोहोचणे ता अहिल्यानगर आणि शिर्डी परिसरातील नागरिकांसाठी अधिक सुलभ होणार आहे.

यापूर्वी पुण्यातून शिर्डीसाठी थेट आणि नियमित रेल्वे उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रवाशांना बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय निवडावा लागत होता. नव्या रेल्वेसेवेमुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर होणार आहे.दरवर्षी देश-विदेशातून लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. अशा परिस्थितीत पुणेशिर्डी थेट रेल्वेसेवा सुरू झाल्याने धार्मिक पर्यटन, व्यापार, दळणवळण आणि प्रादेशिक विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.

## उबेर चालकाला लुटणारे बीडमधील तिघे जेरबंद

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी विशाल सूर्यकांत कट्टीमणी (रा. कोल्हेवाडी, सिंहगड रोड, पुणे) हे उबेर कार चालवत असताना, १३ जून रोजी रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास तीन इसमांनी वाकडेवाडी एस.टी. बसस्थानक (पुणे) ते माळेवाडी (ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) असे भाडे बुक केले. १४ जून रोजी पहाटे पावणे चारच्या सुमारास हॉटेल रिलॅक्स, खोसपुरी शिवार (ता. अहिल्यानगर) जवळ आरोपींनी लघुशंकेचा बहाणा करून गाडी थांबवण्यास सांगितली.

गाडी थांबताच तिन्ही आरोपींनी कारचालक विशाल यांच्या डोक्याला बंदूक लावून, हात बांधले आणि डोक्यात टणक वस्तूने प्रहार केला. चालकाला धाक दाखवून गाडीखाली ढकलून देत, आरोपींनी गाडीतील रोख रक्कम, सोन्याची अंगठी आणि ५ लाख ७० हजार ५०० रुपये किमतीची स्विफ्ट डिझायर कार घेऊन पोबारा केला. याप्रकरणी १५ जून रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (४) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे हा गुन्हा बीड जिल्ह्यातील आरोपींनी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तात्काळ आनंदवाडी (ता. गेवराई, जि. बीड) येथे जाऊन सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु तपास पथकाने पाठलाग करून अत्यंत शिताफीने त्यांना ताब्यात घेतले.

## शोरूममध्ये महिला कर्मचाऱ्यावर हल्ला

बदनामीकारक वक्तव्ये केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. घटनेची माहिती मिळताच फिर्यादी महिलेने आपल्या पतीस शोरूममध्ये बोलावून घेतले. त्यांनी जाब विचारल्यानंतर आरोपी महिलेने त्यांचे कपडे फाडून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या फिर्यादी महिलेलाही हाताने मारहाण करण्यात आली. त्यानंतर आरोपीने त्यांचा परिधान केलेला टॉप फाडून सार्वजनिक ठिकाणी त्यांचा विनयभंग केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

## 'एक विद्यार्थी - एक वृक्ष' संकल्पातून हिरवेगार अहिल्यानगर घडविण्याचा निर्धार - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

त्यामुळे प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल. कार्यक्रमात संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून देत वृक्षारोपण आणि संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. तर मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी आपल्या नेहमीच्या खुमासदार आणि प्रभावी शैलीत केले. तर पर्यवेक्षक कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. यावेळी ग्रीन आर्मी कोअर कमिटीचे सदस्य इंजि. व ॲड. कैलाश दिघे, शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वृक्षरोपांचे वितरण करण्यात आले. ग्रीन सिटी मोहिमेच्या सदस्यांनी यावेळी माहिती देताना सांगितले की, ''एकच लक्ष – १ लाख वृक्ष'' हा संकल्प पूर्ण करण्यासाठी शहरभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक अहिल्यानगर घडविण्याच्या उद्देशाने उर्वरीत विद्यार्थ्यांनाही लवकरच देशी वृक्षांची रोपे वितरित करण्यात येणार आहेत. ''एक विद्यार्थी – एक वृक्ष'' हा संकल्प प्रत्यक्षात उतरवून प्रत्येक विद्यार्थ्याला पर्यावरण रक्षणाच्या चळवळीशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे.